इंडिया फाउंडेशन फॉर द आर्टस् (आयएफए)
मार्ग फाउंडेशन, मुंबईच्या सहकार्याने
त्यांच्या आर्काइव्ह्ज आणि म्युझियम्स कार्यक्रमाअंतर्गत
आयएफए-मार्ग स्कॉलरली आणि क्रिएटिव्ह प्रोजेक्ट्ससाठी
प्रस्ताव मागवत आहे
शेवटची: August 07, 2024

आयएफए, मार्ग फाउंडेशन मुंबईच्या सहकार्याने त्यांच्या आर्काइव्ह्ज आणि म्युझियम्स कार्यक्रमा अंतर्गत, 'आयएफए-मार्ग स्कॉलरली आणि क्रिएटिव्ह प्रोजेक्ट्ससाठी' प्रस्ताव मागवत आहे. कार्यक्रमाचे उद्दिष्ट दुहेरी आहे: एक म्हणजे, कला अभ्यासक आणि संशोधकांना, आर्काइव्ह्ज आणि म्युझियम्स संग्रहात, लोकं सहभागी कशी होतील यासाठी त्यांना नवीन, महत्त्वपूर्ण आणि सर्जनशील दृष्टिकोन निर्माण करण्याची संधी प्रदान करणे आणि दुसरं म्हणजे आणि ही जागा संवाद आणि प्रवचनासाठी व्यासपीठ म्हणून सक्रिय करण्यासाठी. या कार्यक्रमांतर्गत संपन्न झालेल्या पूर्वीच्या प्रकल्पांबद्दल वाचा.

शेवटची: **August 07, 2024**

मार्ग फाउंडेशनबद्दल माहिती:
'मार्ग' हे, कादंबरीकार मुल्क राज आनंद यांनी 1946 मध्ये सुरु केलेले, आणि अजूनही प्रकाशित होणारे भारतातले सगळ्यांत जुने कलेला वाहिलेले मासिक आहे. स्वातंत्र्योत्तर काळात जेव्हां भारत स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी धडपडत होता तेव्हां 'मार्ग' मासिक, भारताच्या विविध सांस्कृतिक परंपरांचे दस्तऐवजीकरण करत होते आणि स्वतंत्र भारताच्या भविष्याबद्दल विचार करण्याच्या नवीन पद्धती सादर करत होते. 'मार्ग'ची 75 वर्षे साजरी करण्यासाठी, मंदिर वास्तुकला, वस्त्र, नृत्य, पूर्व-आधुनिक चित्रकला आणि आधुनिकता यावरील वाचकांची एक मालिका, संग्रहातील निवडक निबंधांसह प्रकाशित करण्यात आली आहे.

आज, 'मार्ग', भारताच्या फारशा ठाऊक नसलेल्या इतिहासाचे दस्तऐवजीकरण करत आहे आणि भारतीय आणि दक्षिण आशियाई सांस्कृतिक पद्धतींच्या विविधतेवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करत आहे. 'मार्ग फाउंडेशन', एक ना-नफा संस्था आहे जी सचित्र कला पुस्तके देखील प्रकाशित करते. 'मार्ग फाउंडेशन' त्यांच्या उत्पादनाच्या उच्च दर्जासाठी आणि उत्कृष्ट संपादकीय मजकुराची आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध आहेत.

संग्रहाबद्दल माहिती:

या प्रकल्पांसाठी सर्व मार्ग प्रकाशने उपलब्ध असतील. 'मार्ग'ने अनेक वर्षं विविध विषयांचा अभ्यास केला आहे. त्यांचा संग्रह विशेषतः खालील बाबींमध्ये समृद्ध आहे:

- आर्किटेक्चर
- कापड
- नृत्य आणि सादरीकरण अभ्यास
- भारतातील आधुनिकतावाद
- चित्रकला परंपरा

आयएफए-मार्ग स्कॉलरली आणि क्रिएटिव्ह प्रोजेक्ट्सच्या व्याप्तीबद्दल:

कलाकार, कला अभ्यासक, आर्किटेक्चर आणि डिझाईनचे पदवीधर विद्यार्थी यांची 'मार्ग'शी ओळख, अनेकदा त्यांच्या महाविद्यालयांमध्ये किंवा त्यांच्या कामामुळे होते. 'मार्ग' तरुण प्रेक्षकांना आणि कला प्रांतात स्वारस्य असणाऱ्या लोकांना सहज उपलब्ध असावा यासाठी आम्ही असे प्रस्ताव मागवत आहोत ज्यांत असे काही संशोधन असेल, जे संवादात्मक कला प्रकारात आणि सहज वापरता येण्याजोग्या साहित्यात रूपांतरित होऊ शकेल.

प्रस्तावित प्रकल्प वर नमूद केलेल्या विषयांवर आधारित असावेत; पण, प्रस्तावित प्रकल्प 'मार्ग'मध्ये उल्लेख झालेल्या भारतीय आणि दक्षिण आशियाई कलेच्या इतर पैलूंचाही शोध घेऊ शकतात. आम्ही असे प्रकल्प शोधत आहोत जे आंतरविद्याशाखीय आणि सहयोगी दृष्टिकोन आणि पद्धतींद्वारे विचार करण्याची क्षमता प्रदर्शित करतात. हिंदी आणि मराठीचे ज्ञान असलेल्या, या भारतीय भाषांमध्ये काम करण्यास उत्सुक असलेल्या अर्जदारांनी, जरूर अर्ज करावा.

स्कॉलरली प्रोजेक्टसाठी, आम्हाला पुढील प्रकारचे प्रस्ताव अपेक्षित आहेत:

- आर्काइव्हजच्या आधारे, तरुण प्रेक्षकांसाठी (पदवी आणि त्याखालील), भारतीय आणि दक्षिण आशियाई कला आणि संस्कृतीवर, संशोधन-आधारित, सामग्री तयार करणे.
- भारतीय कला आणि संस्कृतीवरील संशोधनाचा खजिना या दृष्टीने या संग्रहाचा अभ्यास करणे आणि विषयाच्या व्याप्तीतले त्याचे स्थान यावर संशोधन करणे.
- ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही सार्वजनिक कार्यक्रमांद्वारे संशोधनाचे सादरीकरण.

क्रिएटिव्ह प्रोजेक्टसाठी, आम्हाला पुढील प्रकारचे प्रस्ताव अपेक्षित आहेत:

- या संग्रहाचा पुनर्वापर करण्यासाठी अभिनव क्युरेटोरियल आणि कलात्मक हस्तक्षेप.

- व्हिडिओ गेम, परफॉर्मन्स, फोटो निबंध, परस्परसंवादी कथा, चित्रपट, सचित्र कॅटलॉग, विविध शैली, तंत्र आणि उत्पादन साइट्सच्या प्रक्रियेचे ऑडिओ-व्हिज्युअल दस्तऐवजीकरण इत्यादीद्वारे काही एक परिणाम निर्माण करणे.
- डिजिटल प्रकल्प आणि मल्टीमीडिया सामग्रीची निर्मिती होईल असा प्रस्ताव आणि त्याची अंमलबजावणी.

प्रोजेक्टचा कालावधी: कमाल 15 महिने

प्रकल्प समन्वयकांनी प्मुंबईतील मार्ग फाऊंडेशनच्या प्रत्यक्ष आर्काईव्हजमधे जाऊन बारकाईने संशोधन करणे आवश्यक आहे. प्रकल्प समन्वयकांनी प्रोजेक्टच्या कालावधीत वर नमूद केलेल्या आर्काईव्हजमधे प्रवेश असेल. संशोधनासाठी उपलब्ध संग्रह आणि सामग्रीबद्दल अधिक माहितीसाठी, कृपया ज्योत्स्ना नांबियार, जनरल मॅनेजर, यांच्याशी jyotsna.nambiar@marg-art.org येथे संपर्क साधा किंवा maanasi.baa@marg-art.org येथे कन्टेन्ट मार्केटिंग मॅनेजर, मानसी बा, यांच्याशी संपर्क साधा.

अर्जदाराचा प्रोफाइल:

- आम्ही क्युरेटर, कलाकार, कला-शिक्षक, संशोधक, लेखक, कलाकार तसेच इतर सर्जनशील अभ्यासक आणि संशोधनाची पार्श्वभूमी असलेल्या आणि आर्काइव्हज आणि म्युझियम संग्रहांमध्ये काम करण्यास उत्सुक असलेल्या स्कॉलर्सकडून अर्ज मागवतो आहोत.
- फक्त भारतीय नागरिक अर्ज करण्यास पात्र आहेत. आमच्या पात्रता निकषांबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी, येथे क्लिक करा.

बजेट:

प्रकल्पाचा जास्तीतजास्त खर्च **Rs 3,00,000/-** इतका असू शकतो. एकूण प्रस्तावित खर्चाच्या **30%** इतक्या रक्कमेची विनंती आपण, प्रकल्पाच्या संपूर्ण कालावधीसाठी, मानधन म्हणून करू शकता. एकूण खर्च हा मानधनासहित असेल.

प्रकल्प निधी केवळ प्रकल्प-संबंधित खर्च आणि त्यासंबंधित कामाचा खर्चासाठी आहे आणि कोणत्याही पायाभूत सुविधा किंवा उपकरणे खरेदी त्यांत करता येणार नाही.

प्रस्ताव कसा पाठवावा:

खालील बाबी आम्हाला एकाच ईमेलने पाठवा:

- प्रकल्पाचे थोडक्यात वर्णन करणारा प्रस्ताव (कॉलमध्ये वर्णन केलेल्या आणि ज्यांची कल्पना करता येईल अशा क्रिएटिव्ह परिणामांच्या रूपरेषेसह, किंवा जर तुमचा स्कॉलरली प्रकल्प असेल तर त्याचे संशोधन प्रश्न) जो वर नमूद केलेल्या आर्काइव्हजच्या सामग्रीमधून विकसित केला

जाऊ शकतो. तपशीलात काय करू इच्छिता, दृष्टीकोन आणि संभाव्य परिणामांचा समावेश असावा.

- या सामग्रीमधून विकसित केले जाऊ शकतात अशा इतर सार्वजनिक कार्यक्रमांवर एक संक्षिप्त टीप.
- प्रकल्पाचे तपशीलवार वेळापत्रक.
- तपशीलवार बजेट.
- क्युरेटर, कला अभ्यासक किंवा संशोधक म्हणून तुम्ही ज्या प्रकल्पात सहभागी होता त्या प्रकल्पाच्या संक्षिप्त वर्णनासह तुमचा बायोडाटा. या वर्णनामध्ये त्या प्रकल्पातील काय केले, त्याची प्रक्रिया आणि त्याचे परिणाम यांचा समावेश असावा. कृपया आम्हाला प्रत्यक्ष कागदपत्रे पाठ्वण्याऐवजी त्याच्या इंटरनेट लिंक्स पाठवा.
- तुम्ही तुमचा प्रस्ताव इंग्रजीसह कोणत्याही भारतीय भाषेत लिहू शकता.

तुमचे अर्ज किंवा कोणतीही शंका ऋत्विका मिश्रा यांना ritwika@indiaifa.org येथे ईमेल करा. अशा ईमेलची शीर्षक ओळ असेल: **Application for IFA - Marg Project**

महत्त्वाच्या तारखा:

- अर्ज पाठवण्याची शेवटची August 07, 2024 आहे.
- पात्र उमेदवारांच्या मुलाखती August 2024 मध्ये होणे अपेक्षित आहे.
- प्रकल्प September 2024 पासून 15 महिन्यांच्या कालावधीसाठी सुरू होईल.

आयएफए तुमचा प्रकल्प थेट तुमच्यासोबत प्रकल्प समन्वयक म्हणून राबवेल.

कृपया लक्षात घ्या आयएफए एक असे सुरक्षित वातावरण तयार करण्यासाठी वचनबद्ध आहे जे मुलांसह प्रत्येकाला समर्थन देते, त्यांचा आदर करते आणि त्यांना संरक्षण देते. प्रत्येक अर्जदाराने हे ध्यानात ठेवले पाहिजे आणि या संकल्पनेशी कायम इमान राखले पाहिजे.

कळावे लोभ असावा,

आयएफए टीम